सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/


Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३३० | रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १५७००० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १४५३०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ ११९२०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २४७०/- |

भाव प्रती १० ग्राम




गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## पाणीप्रश्नी आमदार अनिलदादा पाटील यांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांना सुनावले खडेबोल

### दोन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत दिला 'अल्टिमेटम'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील पाणीप्रश्नी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले आहेत. आता नुसते आश्वासन नको, तर लोकांना प्रत्यक्ष पाणी द्या, असे ठणकावून सांगत येत्या दोन दिवसांत संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करा, अशी तंबी देत यासाठीचा 'अल्टिमेटम' दिला आहे.

दि. ३१ जुलै रोजी अमळनेर शहरात अतिवृष्टीमुळे पूरसदृश स्थिती निर्माण झाली. यात बोरी नदी व पिंपळे नाला परिसरात राहणाऱ्या असंख्य नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले. तसेच त्याच काळात शहरात झालेल्या अशुद्ध व गढूळ पाणीपुरवठ्यामुळे अनेक



नागरिकांसह लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आल्याचेही प्रकार घडले. त्यातच अमळनेर शहराला पाणीपुरवठा करणारी वाहिनी फुटल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी मिळू शकलेले नाही. गेल्या २२ दिवसांपासून पाणीप्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केल्याने नागरिकांची पाण्यासाठी त्रेधातिरपीट उडत असल्याने अनेकांनी आमदार अनिलदादा पाटील यांच्याकडे धाव घेऊन या समस्येबाबत तक्रारी केल्या. त्यामुळे आमदार पाटील यांनी पालिकेचे मुख्याधिकारी व पाणीपुरवठा यंत्रणेतील अधिकाऱ्यांना धारेवर धरत दोन दिवसांत संपूर्ण शहरातील लोकांना प्रत्यक्ष पाणी न मिळाल्यास मी स्वतः पालिकेत येऊन जाब विचारणार, असा इशारा दिला आहे. त्यावर अधिकाऱ्यांनी देखील सकारात्मकता दाखवत याबाबत निश्चितपणे गांभीर्याने कार्यवाही करण्याची ग्वाही दिली असल्याचे समजते.

## अल्पवयीन मुलीशी विवाह पडला महागात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अल्पवयीन मुलीशी प्रेमविवाह करून तिला गर्भवती करणाऱ्या तालुक्यातील लडगाव येथील महिलेच्या पतीविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळाला जन्म दिल्यानंतर आधार कार्ड तपासणी केली असता त्यावरून सदर महिला अल्पवयीन असल्याचे निदर्शनास आले आहे.

धनूर-कापडणे (ता. जि. धुळे) येथील एक १५ वर्षे ६ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचा तालुक्यातील लडगाव येथील अजय कैलास अहिरे याच्याशी एक वर्षापूर्वी प्रेम विवाह समाजाच्या रीतीरिवाजाप्रमाणे झाला होता. ती तिच्या पतीपासून सात महिन्यांची गर्भवती झाल्यानंतर धनूर-कापडणे येथे आई-वडिलांकडे गेली होती. दि. ९ ऑगस्ट रोजी तिच्या पोटात दुखू लागल्याने तिला धुळे येथे वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. तिने कन्यारत्नाला जन्म दिला. यावेळी तिच्या आधार कार्डावरून ती अल्पवयीन असल्याचे समजले. त्यानंतर संबंधित डॉक्टरांनी पोलिसांना तत्काळ कळविले. मुलीच्या जबाबावरून पती अजय अहिरे याच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ६४, ६५(१) व पोक्सो कायदा कलम ४, ६ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर तपास करीत आहेत.

## अमळनेरमध्ये उभारणार राज्यातील पहिले 'लाडकी बहीण हॉस्पिटल'!

### नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर : औषधांवरील खर्च कमी करण्याला देणार प्राधान्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' या महाराष्ट्र शासनातर्फे सुरू करण्यात आलेल्या एक महत्त्वाच्या शहरी विकास आणि लोककल्याणकारी योजनेंतर्गत शहरात 'लाडकी बहीण हॉस्पिटल' उभारण्यात येणार आहे. महिलांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणारे बहुधा हे हॉस्पिटल महाराष्ट्रातील पहिलेच असेल, अशी माहिती नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी दिली.

ते म्हणाले, की 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानां'र्गत अमळनेर पालिकेला एक कोटी रुपये प्राप्त होतील. त्यातून महिला, पर्यावरण आणि शिक्षणावर खर्च करायचा आहे. त्या अनुषंगाने अमळनेर पालिकेतर्फे सर्वानुमते महिलांसाठी खास लाडकी बहीण हॉस्पिटल उभारायचे आहे. त्यासाठी पालिकेनेही ५० लाख रुपये खर्च करण्याची तरतूद केली आहे. महिलांना प्रसूतीवेळी, गर्भपिशवी शस्त्रक्रिया, सीझर आदींसाठी खासगी रुग्णालयातील खर्च परवडत नाही आणि सरकारी सुविधा त्या प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे या प्रक्रिया महिलांसाठी अल्पदरात

पान २ वर

## जास्त तेल खाल्ल्यास होणार गंभीर परिणाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

*तेलामध्ये कॅलरीचे प्रमाण जास्त असल्याने त्याचे अतिसेवन वजन वाढण्यास कारणीभूत ठरू शकते. अतितेलकट पदार्थांमुळे अपचन, पोट फुगणे, आम्लपित्त आणि अस्वस्थता जाणवू शकते. अस्वास्थ्यकर चरबीचे प्रमाण जास्त झाल्यास रक्तातील 'वाईट' कोलेस्टेरॉल वाढू शकते. चरबीयुक्त आहारामुळे यकृतात अतिरिक्त चरबी साठण्याची शक्यता वाढते. सतत जास्त कॅलरीयुक्त आणि तेलकट आहार घेतल्याने वजन व चयापचयाशी संबंधित समस्या वाढू शकतात आणि कर्करोगासारख्या महाभयंकर आजाराला बळी पडण्याची शक्यता असते.*

## अमळनेरचा सराईत गुन्हेगार इम्रान शेख सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार

### सणासुदीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांवर पोलिसांची करडी नजर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : शहरातील शाह आलम-नगरमधील इम्रान शेख सलीम (वय २७) याला उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांच्या आदेशाने सहा महिन्यांकरिता जळगाव जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. अमळनेर तालुक्यातील गुन्हेगारांवर पोलिसांची करडी नजर असून, सणासुदीला ही कारवाई झाल्यामुळे गुन्हेगारांमध्ये खळबळ माजली आहे.



**"वारंवार गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य करणे तसेच अशांतता निर्माण करून कायदा व सुव्यवस्था भंग करून सामान्य जनतेस वेठीस धरणे, अशा पद्धतीचे कृत्य करणाऱ्यांवर यापुढेही कडक कारवाई केली जाईल.**
**– विनायक कोते,** डीवायएसपी, अमळनेर उपविभाग.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, डीवायएसपी विनायक कोते यांनी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्यामार्फत गुन्हेगारांचा आढावा घेतला आहे. आगामी ईद, रक्षाबंधन, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी या

पान २ वर

## पात्र सफाई कर्मचाऱ्यांना तत्काळ योजनांचा लाभ द्या

### मृत, अपंग कर्मचाऱ्यांच्या नुकसानभरपाईसह घरकुल, वारसा हक्क नियुक्तीचा घेतला आढावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांच्या अध्यक्षतेखाली येथील पालिकेत सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसह शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी बैठक झाली. पात्र सफाई कर्मचाऱ्यांना योजनांचा लाभ कोणत्याही विलंबाशिवाय देण्यात यावा, असे निर्देश श्री. सारवान यांनी मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना दिले.

दूषित व धोकादायक गटारांमध्ये काम करताना मृत्यू झालेल्या किंवा कायमचे अपंगत्व आलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक नुकसानभरपाईबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांचे हक्क

पान २ वर

### पत्रकार परिषदेतही प्रश्नांवर चर्चा

बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या, त्यांच्या हक्कांसाठी असलेल्या विविध योजना आणि योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणींबाबत माहिती देण्यात आली. पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.



**अमळनेर : महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांच्या अध्यक्षतेखाली येथील पालिकेत सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसह शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी बैठक झाली. त्यात पालिकेतील पात्र सफाई कर्मचाऱ्यांना तत्काळ योजनांचा लाभ कोणत्याही विलंबाशिवाय द्यावा, असे निर्देश मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना देताना श्री. सारवान. शेजारी आयोगाचे स्वीय सहाय्यक राजेश सोनवणे, सर्व विभागप्रमुख, विविध सफाई कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी व सफाई कर्मचारी.**




## अमळनेरमध्ये श्रावणीय कानबाई माता उत्सवाला प्रारंभ

### अभिषेकासह विविध धार्मिक कार्यक्रमांद्वारे आज सायंकाळी होणार मातेची स्थापना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : खानदेशातील जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यातील अतिशय महत्त्वपूर्ण व तितकाच प्रसिद्ध, श्रद्धा आणि उत्साहाचा लोकोत्सव म्हणून मान्यता असलेल्या कानबाई माता उत्सवाला आज शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी प्रारंभ झाला.

शहरातील शनिपेठेतील चोपडा नाक्यानजीक दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रावणीय कानबाई माता उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. २२ ऑगस्ट ते सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रम, पूजन, महाआरती, जागरण तसेच भव्य विसर्जन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्सवांतर्गत आज पहिल्या दिवशी शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता रोट पूजनाचा कार्यक्रम झाला. यावेळी भाजी-भाकर, रास पूजन, गहू दळणे तसेच मातेचा माल रांधण्याचा धार्मिक विधी पार पडला.

आज कानबाई मातेचा अभिषेक रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता कानबाई मातेचा अभिषेक करण्यात येणार असून, सायंकाळी ५ वाजता कानबाई माता स्थापना, नैवेद्य व रोट पूजन होईल. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता कानबाई मातेची महाआरती आणि जागरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत कानबाई मातेची भव्य विसर्जन मिरवणूक काढण्यात येणार आहे. या धार्मिक सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

या उत्सवासाठी श्री. १००८ महामंडलेश्वर पार्वती आई परशुराम जोगी नंदगिरीजी, आंतरराष्ट्रीय किन्नर आखाडा उपाध्यक्ष, धुळे यांच्या उपस्थितीचे विशेष महत्त्व आहे.

श्रावणीय कानबाई माता महोत्सवाच्या निमित्ताने सर्व भक्तांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी तसेच कानबाई मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद घ्यावा, असे आवाहन उत्सवाचे निमंत्रक श्री महंत हरिहरा पार्वती नंदगिरी दादू महाराज ऊर्फ दादू भगत, आंतरराष्ट्रीय किन्नर आखाडा, अमळनेर यांनी केले आहे.



## संपादकीय

# नव्या–जुन्यांची 'नवलाई'

बराच काळ खल केल्यानंतर आणि देशभरात होत असलेल्या बदलांची दखल घेऊन भारतीय जनता पक्षाचे नूतन अध्यक्ष नितीन नवीन यांनी आपल्या नव्या संघाची घोषणा केली आहे. या ६५ जणांच्या नव्या कार्यकारिणीमध्ये ५१ नवे चेहरे असले, तरी कळीच्या पदांवर आजवर स्वत:ला सिद्ध केलेल्या नेत्यांवरच टाकण्यात आलेला विश्वास आणि काही काळ बाजूला गेलेल्या नेत्यांचे पुनरागमन, असे या बदलांचे वर्णन करता येईल. एक तपाहून अधिक काळ भाजपचे प्रमुख शस्त्र असलेल्या 'आयटी सेल'चे प्रमुख अमित मालवीय आणि युवा मोर्चाचे अध्यक्ष तेजस्वी सूर्या यांना मिळालेला अर्धचंद्र गेल्या दोन–चार महिन्यांतील घडामोडींचे प्रतिबिंब ठरावे; तर संघटनात्मक सरचिटणीस बी. एल. संतोष आणि विनोद तावडे यांच्याकडील महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही कायम ठेवल्या आहेत; तावडे यांच्याकडे उत्तर प्रदेशाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. त्याबरोबरच माजी मंत्री स्मृती इराणी, आणि राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे अशा नेत्यांचे या निमित्ताने पुनरागमन झाले आहे. 'निवडणूक जिंकणे' ही प्राथमिक; किंबहुना एकमेव जबाबदारी असलेल्या या पक्षसंघटनेत पुढील वर्षीच्या उत्तर प्रदेशासह अन्य विधानसभा निवडणुका आणि लोकसभेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विविध प्रांत आणि जाती–धर्मातील नेत्यांचा मिलाफ साधण्याचाही प्रयत्न यातून दिसतो. मात्र, मैदानात लढणारे चेहेरे नवे दिसत असले, तरी निर्णय प्रक्रियेची खरी सूत्रे येण्यासाठी पक्षातील नव्या पिढीला अजूनही वाट पाहावी लागेल, हे यातून स्पष्ट झाले.

बदलत्या समाजमनातील नवनव्या प्रवाहांची दखल घेऊन आपल्या संरचनेत सहजतेने बदल करणे आणि भविष्याचा विचार करून नवी फळी पुढे आणणे, हे भारतीय जनता पक्षाचे वैशिष्ट्य. त्याबरोबरच जास्तच स्थिरावू पाहणाऱ्या नेत्यांच्या पायाखालचे जाजम अलगद काढून घेण्यातही भाजपच्या नेतृत्वाचा हातखंडा आहे. संघटनात्मक फेरबदलांमध्ये त्याचे प्रत्यंतर येते. प्रमुख जबाबदारी असलेल्या सरचिटणीसांमध्ये संतोष व तावडे यांची पूर्वीची कामगिरी पाहून पुन्हा विश्वास टाकण्यात आला असून, त्यांच्या जोडीने स्मृती इराणी, सुनील बन्सल आणि विप्लवकुमार देव यांना स्थान मिळाले आहे. वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्याकडे पक्षाच्या खजिनदारपदाच्या किल्ल्या आल्या आहेत; मात्र 'एक व्यक्ती–एक पद' हे सूत्र लावण्याचे नेतृत्वाच्या मनात आलेच, तर फेरबदलात त्यांच्या मंत्रिपदाचे काय होणार आणि संघटनेतून वगळलेल्यांची लॉटरी लागणार का, या चर्चांना उधाण आल्यास नवल नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून आलेले राम माधव यांच्याकडे उपाध्यक्षपदाची जबाबदारी देऊन 'संघप्रणामा'चा उपचारही पार पाडल्याचे दिसते. वसुंधराराजे यांनाही स्थान देऊन राजस्थानच्या नेतृत्वाच्या स्वप्नांना आवर घालण्याचाही संदेश देण्याचा प्रयत्न दिसतो. नवीन यांच्या नव्या संघात महाराष्ट्रातून तावडे, गोयल आणि भारती पवार यांना संधी मिळाली असून पंकजा मुंडे यांना वगळले आहे. आम आदमी पक्षातून आलेले संदीप पाठक यांची संघटनेत सोय लागली; आता राघव चढ्ढा यांना कोठे सामावून घेणार, याचीही उत्सुकता आहे.

भाजपच्या या फेरबदलामध्ये सर्वाधिक चर्चा झाली, ती 'आयटी सेल'चे प्रमुख अमित मालवीय यांच्या गच्छंतीबाबत. गेली बारा वर्षे या विभागाने समाजमाध्यमांच्या मैदानात अनेक प्रकारे हल्ले करून विरोधकांना जेरीस आणले आणि भाजपला अनुकूल प्रचारकी कथन उभे करण्यात यश मिळविले होते. मात्र, नुकत्याच 'जेन झी'च्या आंदोलनाला तोंड देताना त्यांची त्रेधा उडाल्याचे देशाने पाहिले. त्यामुळेच आता दीपक म्हस्के, प्रीती गांधी, आलोक भट आणि अरुण यादव यांच्याकडे ही जबाबदारी आली आहे; त्यातील काही जणांबाबत पूर्वीचे वादही आहेत. मात्र, आता 'व्हॉट्सअ‍ॅप फॉरवर्ड'वर विश्वास न ठेवता खरे–खोटे करणाऱ्या नव्या पिढीशी आणि तेवढ्याच आक्रमक विरोधकांशी सामना आहे, हे विसरून चालणार नाही. आजवर प्रसंगी सारे मंत्रिमंडळ बदलून भाजपने प्रस्थापितविरोधी भावनेवर मात केली. पण नव्या पिढीचा विश्वास कमावण्यासाठी केवळ चेहरे बदलण्यावर न थांबता बेकारी, महागाई आणि शिक्षण व्यवस्था अशा मुद्द्यांवर प्रामाणिक संवाद सुरू करणार का, हा खरा प्रश्न आहे. संघटनात्मक बदल निवडणूककेंद्री आहेतच; ते भविष्यवेधी ठरणार का, याचे उत्तर काही काळाने मिळेल.

# कानबाई माता : खानदेशवासींच्या श्रद्धेला आध्यात्मिक अधिष्ठान देणारा उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खानदेशातील लोकजीवन, श्रद्धा, संस्कृती आणि कौटुंबिक परंपरा यांचे एक सुंदर प्रतिबिंब म्हणजे कानबाई माता उत्सव. श्रावणातील पवित्र वातावरणात साजरा होणारा हा उत्सव केवळ धार्मिक विधी किंवा सांस्कृतिक सोहळा नसून, खानदेशातील असंख्य कुटुंबांच्या भावविश्वाला जोडणारा एक आध्यात्मिक अनुभव आहे. कानबाई मातेच्या रूपात भक्तांना मातृशक्ती, करुणा, संरक्षण आणि समृद्धीचे दर्शन घडते. त्यामुळे या उत्सवाकडे केवळ परंपरेच्या दृष्टिकोनातून नव्हे, तर आत्मशुद्धी, श्रद्धा आणि सामूहिक भक्तीचा उत्सव म्हणून पाहणे अधिक उचित ठरते.

कानबाई मातेच्या पूजेमागे 'आई' या भावनेला विशेष स्थान आहे. भक्त आपल्या सुख–दुःखांचे गाऱ्हाणे मातेच्या चरणी मांडतो आणि तिच्या कृपाशीर्वादातून मानसिक आधार मिळवतो. संसारातील अडचणी, चिंता आणि अस्थिरतेच्या काळात मातेच्या चरणी नतमस्तक होणे म्हणजे आपल्या अंतर्मनातील भार श्रद्धेच्या हवाली करण्यासारखे आहे. 'माता आपले रक्षण करील, योग्य मार्ग दाखवील' हा विश्वास भक्तीला आध्यात्मिक बळ देतो.

कानबाई उत्सवात घराघरांत केली जाणारी पूजा, नैवेद्य, आरती, भजन–कीर्तन आणि विविध धार्मिक विधींना केवळ कर्मकांडाचे स्वरूप नसते. या सर्व कृतींमागे मन एकाग्र करण्याची, अहंकार बाजूला ठेवण्याची आणि ईश्वराशी अंतर्मनातून संवाद साधण्याची भावना असते. कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येऊन मातेची आराधना करतात, तेव्हा घरातील वातावरणही भक्तिमय होते. अशा सामूहिक उपासनेतून 'मी'पेक्षा 'आपण' ही भावना अधिक दृढ होते, हाच या उत्सवाचा आध्यात्मिक संदेश आहे.

खानदेशातील कानबाई उत्सवाची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे त्यातील सामूहिकता. माहेरवाशिणी, मुली, जावई, नातेवाईक, शेजारी आणि गावकरी या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येतात. अनेक ठिकाणी मातेची मिरवणूक, पारंपरिक गीते आणि भक्तिगीते यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारून जातो. या सामूहिक सहभागातून सामाजिक बंध अधिक दृढ होतात. परस्परांविषयी आपुलकी, सहकार्य आणि स्नेह निर्माण होतो. त्यामुळे कानबाई उत्सव हा व्यक्तीच्या भक्तीपासून समाजाच्या एकात्मतेपर्यंत नेणारा आध्यात्मिक सेतू ठरतो.

या उत्सवात खानदेशाची वैशिष्ट्यपूर्ण अहिराणी लोकसंस्कृतीही जिवंत राहते. पारंपरिक गीते, बोलीभाषा, पोशाख, खाद्यसंस्कृती आणि लोकपरंपरा यांना कानबाई उत्सवामुळे नवी ऊर्जा मिळते. आधुनिकतेच्या वेगवान प्रवाहातही पिढ्यान्–पिढ्या चालत आलेल्या श्रद्धा आणि परंपरा पुढील पिढीकडे हस्तांतरित करण्याचे काम हा उत्सव करतो. त्यामुळे कानबाई माता उत्सव हा धर्म आणि संस्कृती यांचा सुंदर संगम आहे.

आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिले तर कानबाई म्हणजे केवळ एका देवतेची पूजा नव्हे; ती मातृशक्तीवरील अखंड विश्वासाची अभिव्यक्ती आहे. संकटात धीर देणारी, कुटुंबाला एकत्र ठेवणारी, सद्विचारांची प्रेरणा देणारी आणि जीवनात आशावाद जागवणारी शक्ती म्हणून भक्त कानबाई मातेकडे पाहतात. मातेच्या पूजेतून मनात कृतज्ञता, संयम, श्रद्धा आणि सद्भावना निर्माण होणे, हाच या उत्सवाचा खरा आध्यात्मिक गाभा आहे.

आजच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात अशा उत्सवांचे महत्त्व अधिक वाढते. काही काळासाठी का होईना, माणूस आपल्या दैनंदिन चिंता बाजूला ठेवून श्रद्धेच्या वातावरणात रमतो. कुटुंबीयांसोबत वेळ घालवतो, वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद घेतो आणि आपल्या मुळांशी पुन्हा जोडला जातो. हीच अंतर्मुखता कानबाई उत्सवाला केवळ उत्सव न ठेवता एक आध्यात्मिक पर्व बनवते.

कानबाई मातेच्या चरणी व्यक्त होणारी श्रद्धा ही खानदेशाच्या सामूहिक चेतनेचा एक अविभाज्य भाग आहे. काळ बदलला, जीवनशैली बदलली, उत्सव साजरा करण्याच्या पद्धती बदलल्या; तरी मातेविषयीची भक्ती आणि तिच्या आशीर्वादावरील विश्वास आजही कायम आहे. म्हणूनच कानबाई उत्सव हा परंपरेचा वारसा, भक्तीचा प्रकाश आणि आध्यात्मिक एकात्मतेचा अनुभव देणारा खानदेशाचा वैशिष्ट्यपूर्ण उत्सव म्हणून पुढेही जपला जाणे आवश्यक आहे.




# सर्दी, खोकला आणि कफवर घरगुती उपाय

**लवंगाच्या पाण्यात 'ही' पाने टाकून प्या**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बदलत्या हवामानामुळे सर्दी, घसा खवखवणे, आणि छातीत कफ साचणे या समस्या उद्भवतात. अनेकजण या समस्यांवर उपाय म्हणून गोळ्या– औषधे घेतात. मात्र, यामुळे शरीरावर परिणाम होतो.

**हेल्दी ड्रिंक :** यासाठी आज आम्ही तुम्हाला घरगुती एक सोपा उपाय सांगणार आहे जो तुम्ही लगेचच करून पाहा. स्वयंपाकघरातील मसाल्यांचा वापर तुम्ही सर्दी–खोकला आणि कफवर करू शकता.

**गुणकारी लवंग :** लवंग आयुर्वेदिक गुणधर्मासाठी ओळखली जातात. लवंगाचा वापर पारंपरिक घरगुती उपायांमध्ये केला जातो.

**तमालपत्राची पाने :** लवंगासोबत तमालपत्राची पाने उकळून तयार केलेले कोमट पाणी घशाला आराम देण्यास मदत करू शकते.

**कसा करावा हा काढा?**

गॅसवर एका पातेल्यात एक ग्लास पाणी उकळायला ठेवा. त्यात तमालपत्र आणि लवंग टाका. पाणी चांगले उकळवून घ्या. त्यानंतर आयुर्वेदिक काढा तयार होईल.



**तमालपत्र आणि लवंग पाण्याचे जबरदस्त फायदे**

१) तमालपत्रामध्ये असणारे अँटी–बॅक्टेरियल आणि दाहक–विरोधी गुणधर्म घशातील खवखव कमी करतात. २) छातीत साचलेला चिकट कफ विरघळवून बाहेर टाकण्यास मदत करतात. ३) लवंग घशातील जळजळ शांत करते आणि खोकला कमी करते.

# आमिर खान ६१ व्या वर्षी देखील फिट कसा?

## 'केबीसी'च्या सेटवरच सांगून टाकले गुपित, म्हणाला... 'मी रोज सकाळी उठून...'


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडचा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' म्हणजेच आमिर खान वयाच्या ६१ व्या वर्षी देखील एकदम फिट आणि तरुण दिसतो. त्याच्या फिटनेसचे मुख्य कारण संतुलित आहार आणि शिस्तबद्ध जीवनशैली हे आहे. अशातच आमिरने 'कौन बनेगा करोडपती'च्या सेटवर हजेरी लावली होती. या सेटवर त्याने आपल्या फिटनेसबद्दलचा खुलासा केला आहे.

केबीसी १८ च्या हॉट सीटवर बसलेला आमिर खान फिटनेसचे सिक्रेट सांगताना म्हणाला, 'माझी रोज एक सवय आहे. मी रोज सकाळी उठल्यावर पहिले काम म्हणजे एक मोठा चमचा शुद्ध देशी तूप खातो. तूप हे शरीरासाठी फायदेशीर असते आणि ते चांगले सुद्धा लागते.'

आमिरचे बोलणे ऐकून अमिताब बच्चन गंमतीत म्हणाले, 'देशी तूप खाल्ल्याने मेंदू नेहमी ताजा आणि सक्रीय राहतो. त्यामुळे आजपासून मी सुद्धा रोज तूप खाणे सुरु करणार आहे.' दोघांचे बोलणे ऐकून उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

दरम्यान, याआधी देखील आमिरने मुलाखतीमध्ये त्याच्या आहार आणि कसरतीबाबत सांगितले आहे. तो म्हणाला, की ५० टक्के आहार, २५ टक्के कसरत आणि २५ टक्के विश्रांती हे तुमचे वजन, झोप कमी करण्यासाठी मदत करते. तसेच शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी तो रोज रात्री किमान ८ तासांची झोप घेतो. दरम्यान, आमिर खानने निर्मित केलेला 'बटवारा १९४७' हा सिनेमा सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालतोय. या सिनेमात सनी देओल आणि प्रीती झिंटा मुख्य भूमिकेत आहेत. सिनेमाला प्रेक्षकांची पसंती मिळताना पाहायला मिळत आहे.



## अमळनेरमध्ये उभारणार राज्यातील पहिले 'लाडकी बहीण हॉस्पिटल'!

**पान १ वरून :** उपलब्ध केल्या जातील. पालिका फंडातून देखील मदत करण्याचा मानस आहे. त्यासाठी ५ हजार स्क्वेअर फूट जागेची तरतूद करण्यात येईल. स्वतंत्र प्रसूती कक्ष, जनरल वार्ड, साधारणतः २० बेड सुरूवातीला असतील. स्वतंत्र ऑपरेशन थिएटर असेल. तसेच महिलांच्या इतर समस्यांवर देखील उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातील. त्यासाठी भविष्यात विशेष स्त्रीरोगतज्ज्ञांचीही नियुक्ती असेल. अशा प्रकारे लाडक्या बहिणींसाठी, महिलांसाठी स्वतंत्र हॉस्पिटल उभारणारी अमळनेर पालिका ही राज्यातील पहिलीच असेल. यासोबत स्वतंत्र विज्ञान प्रकल्प, जलतरण तलाव अशा विविध सुविधा आणि विकासकामे करण्याचाही प्रयत्न सुरू असून, शासनाकडे डीपीआर प्रस्ताव पाठवून विशेष निधी मिळविण्याचे देखील प्रयत्न सुरू आहेत.

## पात्र सफाई कर्मचाऱ्यांना तत्काळ योजनांचा लाभ द्या

**पान १ वरून :** अबाधित ठेवून त्यांना शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळणे आवश्यक असल्याचे श्री. सारवान यांनी यावेळी स्पष्ट केले. बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत घरांचा प्रश्न, लाड–पागे वारसा हक्क नियुक्ती योजना, तसेच सफाई कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साहित्य व सेफ्टी किटचा पुरवठा यांचा आढावा घेण्यात आला. संबंधित योजनांमध्ये पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे प्रलंबित ठेवू नयेत आणि त्यांना तातडीने लाभ मिळवून द्यावा, अशा सूचना देण्यात आल्या. सफाई कर्मचाऱ्यांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरजही बैठकीत अधोरेखित करण्यात आली. आवश्यक आधुनिक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाला सूचित करण्यात आले. यावेळी आयोगाचे स्वीय सहाय्यक राजेश सोनवणे, पालिका मुख्याधिकारी शिंदे, सर्व विभागप्रमुख, विविध सफाई कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार तसेच मोठ्या संख्येने सफाई कर्मचारी उपस्थित होते.

## अमळनेरचा सराईत गुन्हेगार इम्रान शेख हद्दपार

**पान १ वरून :** सणांच्या पार्श्वभूमीवर समाजातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडविणारे, दादागिरी, गुंडगिरी करणारे तसेच ज्यांच्यापासून दहशत, भीती आहे अशा गुन्हेगारांचे हद्दपारीचे प्रस्ताव तयार करण्यात येत आहेत. शाह आलमनगरमधील इम्रान शेख सलीम याच्यावर तीन गुन्हे दाखल आहेत. इम्रानने ईद मिरवणुकीत दगडफेक केली होती. तसेच त्याच्यापासून सामाजिक शांततेचा भंग होत होता. पोलिसांनी उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांच्याकडे इम्रान शेख सलीम यास जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता हद्दपार करण्याचा प्रस्ताव पाठविला होता. त्यावर सुनावणी होऊन दोन्ही पक्षांच्या बाजू ऐकून गोपनीय साक्षीदार तपासल्यावर प्रांताधिकारी भंगाळे यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ च्या कलम ५६ (अ) (ब) प्रमाणे इम्रानला जळगाव जिल्ह्यातून सहा महिन्यांकरिता हद्दपार करण्याचे आदेश दि. २१ जुलै रोजी हद्दपार केले आहे.

# तुमचे बँक खाते बिना 'ओटीपी'चे रिकामे होऊ शकते

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डिजिटल बँकिंगच्या जमान्यात अनेकांचा असा गैरसमज असतो, की जोपर्यंत आपण ओटीपी सांगत नाही तोपर्यंत आपले पैसे सुरक्षित आहेत. मात्र, सायबर गुन्हेगारांनी आता सिम स्वॅपिंग आणि मालवेअरसारख्या अशा ५ अपग्रेड पद्धती शोधल्या आहेत. ज्यामध्ये कोणत्याही पासवर्डशिवाय थेट तुमचे बँक खाते रिकामे केले जाऊ शकते. चला तर मग याविषयीची माहिती पुढे जाणून घेऊया.

तुम्हाला कोणत्याही प्रकारचा ओटीपी येणार नाही आणि तुमचे बँक खाते रिकामे होईल. हो. हे घडू शकते. कारण असे प्रकार आता समोर येऊ लागले आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सायबर सेलने युझर्सना ऑनलाईन फसवणुकीपासून वाचण्यासाठी ५ महत्त्वाच्या गोष्टींबाबत तातडीने सावध राहण्याचा इशारा दिला आहे. एआय व्हॉईस क्लोनिंग, पब्लिक वाय–फायचा बेजबाबदार वापर आणि संशयास्पद लिंक्समुळे बँक डिटेल्स चोरीला जाऊन युजर्सचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे समोर आले असून वेळीच खबरदारी घेणे आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात ऑनलाईन बँकिंग आणि यूपीआयमुळे पैशांचे व्यवहार अत्यंत सोपे झाले आहेत. मात्र, या सोयीसोबतच सायबर गुन्हेगारीचा धोकाही प्रचंड वाढला आहे. अनेक लोकांचा असा गैरसमज असतो की, जोपर्यंत आपण कोणाला आपला वन–टाइम पासवर्ड म्हणजेच ओटीपी सांगत नाही, तोपर्यंत आपले बँक खाते सुरक्षित आहे. मात्र, सायबर भामट्यांनी आता अशा काही प्रगत तंत्रज्ञानाचा शोध लावला आहे. ज्यामध्ये कोणताही ओटीपी न मागता थेट तुमचे बँक खाते रिकामे केले जाऊ शकते. केंद्रीय गृह मंत्रालयांतर्गत येणाऱ्या 'राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टल' आणि बँकिंग सुरक्षा तज्ज्ञांनी युजर्सना सुरक्षित राहण्यासाठी ५ प्रमुख गोष्टींपासून तातडीने सावध राहण्याचा इशारा दिला आहे.

**१) सिम स्वॅपिंगचा धोका**

हा सध्याचा सर्वांत धोकादायक सायबर फ्रॉड आहे. यामध्ये हॅकर्स तुमच्या नावाचे बनावट ओळखपत्र तयार करून मोबाईल कंपनीकडून तुमच्याच नंबरचे दुसरे सिम कार्ड जारी करून घेतात. नवीन सिम कार्ड सुरू होताच तुमच्या मोबाईलमधील नेटवर्क गायब होते आणि बँक खात्याशी संबंधित सर्व ओटीपी आणि मेसेज थेट हॅकर्सच्या नवीन सिमवर जाऊ लागतात. तुम्हाला काही समजण्यापूर्वीच खाते रिकामे होते. त्यामुळे मोबाईलचे नेटवर्क अचानक दीर्घकाळ गायब झाल्यास त्वरित कंपनीशी संपर्क साधा.

**२) मालवेअर आणि स्क्रीन शेअरिंग ॲप्स**

हॅकर्स अनेकदा लॉटरी, मोफत रिचार्ज किंवा बंपर डिस्काउंटच्या आमिषाने तुम्हाला संशयास्पद लिंक्स पाठवतात. तुम्ही त्या लिंकवर क्लिक करताच मोबाईलमध्ये 'मालवेअर' नावाचा धोकादायक व्हायरस किंवा 'ॲनी डेस्क' आणि 'टीम व्हीवर'सारखे स्क्रीन शेअरिंग ॲप्स गुपचूप डाऊनलोड होतात. याद्वारे हॅकर्सला तुमच्या मोबाईल स्क्रीनचा संपूर्ण ॲक्सेस मिळतो. ते तुमच्या नकळत मोबाईलमधील बँक डिटेल्स पाहू शकतात आणि स्क्रीनवरूनच ओटीपी चोरून व्यवहार पूर्ण करतात.




**३) एआय व्हॉईस क्लोनिंग**

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या जमान्यात हॅकर्सने फसवणुकीचा एक नवा मार्ग शोधला आहे. तुमच्या एखाद्या जवळच्या मित्राचा किंवा नातेवाईकाचा आवाज हुबेहूब तयार करून हॅकर्स तुम्हाला फोन करतात आणि "मी मोठ्या संकटात अडकलो आहे, तातडीने पैसे पाठव," अशी विनवणी करतात. अनेकदा आपण आवाजावर विश्वास ठेवून कोणताही विचार न करता किंवा ओटीपीची वाट न पाहता स्वतःहून पैसे ट्रान्सफर करतो. असा कोणताही संशयास्पद फोन आल्यास आधी त्या नातेवाईकाला दुसऱ्या नंबरवर फोन करून खात्री करा.

**४) पब्लिक वाय–फाय**

रेल्वे स्टेशन, बसस्टँड, कॅफे किंवा हॉटेलमधील मोफत मिळणारे पब्लिक वाय–फाय वापरून कधीही गुगल पे, फोन पे किंवा नेट बँकिंगचे व्यवहार करू नका. हे ओपन नेटवर्क्स सुरक्षित नसतात. हॅकर्स या नेटवर्कवर पाळत ठेवून असतात आणि तुम्ही पासवर्ड किंवा बँक डिटेल्स टाईप करताच ते 'मॅन–इन–द–मिडल' (MITM) हल्ल्याद्वारे तुमचा संपूर्ण डेटा सहज चोरू शकतात. ऑनलाईन आर्थिक व्यवहारांसाठी नेहमी स्वतःचा सुरक्षित मोबाईल डेटाच वापरा.

**५) यूपीआय ऑटो–डेबिट नियम**

अनेकदा आपण विविध ॲप्सचे सबस्क्रिप्शन घेताना किंवा ऑनलाईन खरेदी करताना नकळतपणे 'ऑटो–डेबिट' किंवा 'मँडेट' सुविधेला मंजुरी देतो. यामध्ये ठराविक कालावधीनंतर तुमच्या खात्यातून पैसे आपोआप कट होतात आणि त्यासाठी कोणत्याही ओटीपीची आवश्यकता भासत नाही. जर तुम्ही एखाद्या अनधिकृत किंवा फसव्या ॲपला चुकून असा ॲक्सेस दिला असेल, तर ते तुमच्या खात्यातून वारंवार पैसे चोरू शकतात.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# लगातार ३७ प्रतियोगी परीक्षाओं में सफलता, पहले प्रयास में यूपीएससी क्रैक

**सक्सेस स्टोरी**

## अब देश के टॉप १०० आयपीएस में शामिल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिलचस्प बात यह है कि जब वो यूपीएससी की तैयारी कर रहे थे, तब उन्होंने एक या दो नहीं बल्कि करीब ३७ प्रतियोगी परीक्षाएं दी और करीब सभी में सफलता हासिल की थी। आज उनकी पहचान एक शानदार ऑफिसर के तौर पर है।

कहते हैं कि अगर आपके अंदर कुछ करने का जुनून और दृढ़ संकल्प हो, तो मंजिल पाने में आपको तनिक भी देर नहीं लगेगी। कुछ ऐसी ही कहानी है आईपीएस अधिकारी अनुराग आर्य की, जिन्होंने अपने मेहनत के दम पर पहले ही प्रयास में यूपीएससी की परीक्षा क्रैक की और १६३वीं रैंक हासिल की। दिलचस्प बात यह है कि जब वो यूपीएससी की तैयारी कर रहे थे, तब उन्होंने एक या दो नहीं बल्कि करीब ३७ प्रतियोगी परीक्षाएं दी और करीब सभी में सफलता हासिल की थी। आज उनकी पहचान एक शानदार ऑफिसर के तौर पर है। जिन्होंने अपने कार्यकाल में एक से बढ़कर एक खूंखार अपराधियों को धूल चटाया है। यही वजह है कि अनुराग आर्य ने देश के १०० सर्वश्रेष्ठ जिला पुलिस प्रमुखों की सूची में जगह बनाई है।

**बागपत के छपरौली गांव में जन्म**

अनुराग आर्य का जन्म १९८७ में बागपत जिले के छपरौली गांव में हुआ। परिवार में उनकी मां डॉ. पूनम आर्य, पत्नी वनिका सिंह और बेटी अनाइका आर्य हैं। पत्नी वनिका सिंह पीसीएस अधिकारी हैं। आईपीएस अनुराग आर्य अमेठी, बलरामपुर, मऊ, प्रतापगढ़ और आजमगढ़ में सेवाएं दे चुके हैं। वह बास्केटबॉल के खिलाड़ी हैं। नेहरू पर्वतारोहण संस्थान, उत्तरकाशी से प्रशिक्षित पर्वतारोही, ओली से प्रमाणित स्कीयर हैं और हैदराबाद मैराथन और दिल्ली हाफ मैराथन सफलतापूर्वक पूरी कर चुके हैं।

**कहां से की पढ़ाई लिखा**

अनुराग आर्य ने अपनी प्रारंभिक शिक्षा गांव के ही सरस्वती शिशु मंदिर से प्राप्त की और फिजिक्स में बीएससी (ऑनर्स) की डिग्री हासिल की। पहले उनका सेलेक्शन आरबीआई में हुआ था, इसके करीब आठ महीने बाद साल २०१३ में वह पहले प्रयास में ही आईपीएस बने, जिसमें उनकी रैंक १६३ थी।

**३७ प्रतियोगी परीक्षाएं की पास**

यूट्यूब के एक वीडियो में वो बताते हैं कि जब वो यूपीएससी की तैयारी कर रहे थे, तब उन्होंने करीब ३७ प्रतियोगी परीक्षाएं थी और जिसमें उन्होंने सभी में सफलाएं हासिल की थी। लेकिन पहली प्रतियोगी परीक्षा जिसमें मुझे असफलता मिली वो थी आरबीआई की परीक्षा। वो कहते हैं कि मैंने पहली बार उस परीक्षा में हिस्सा लिया, लेकिन सफल नहीं हो पाया। इसकी एक वजह यह थी कि में साइंस का छात्र था। वो कहते हैं कि उस परीक्षा के लिए मुझे अचानक इकोनॉमिक्स और फाइनेंस जैसे विषयों की तैयारी करनी पड़ी। लेकिन दोबारा प्रयास किया, तो सफल रहें।

**ऐसे की तैयारी**

इतना ही नहीं वो बताते हैं कि पहले उन्होंने करीब डेढ़ साल जमकर यूपीएससी की तैयारी की। इसके बाद उन्होंने करीब ७ से ८ दोस्तों के ग्रुप के साथ तैयारी की। वो बताते हैं कि वे अक्सर पूरी रात बैठकर पढ़ते थे और दिन में आराम करते थे। उन्हें इस दौरान अपने दोस्तों के बीच बनी टीम स्प्रिट सबसे ज्यादा अच्छी लगी। उनके मुताबिक, यूपीएससी जैसी कठिन परीक्षा की तैयारी में इस तरह की टीम भावना बनाना सामान्यतः मुश्किल होता है। लेकिन उनके लिए परफेक्ट साबित हुआ। आखिरकार वे पहले ही प्रयास में यूपीएससी में सफल हो गए। लेकिन उनके कई दोस्त ऐसे भी थे जो लगातार प्रयास कर रहे थे। कुछ का दूसरा प्रयास हो चुका था, कुछ तीसरे प्रयास में थे और कुछ कई वर्षों से तैयारी कर रहे थे।



**टॉप १०० में बनाई जगह**

बता दें कि फेम इंडिया-एशिया पोस्ट के राष्ट्रीय सर्वेक्षण में देशभर के जिला पुलिस प्रमुखों में से चयनित १०० अधिकारियों में उत्तर प्रदेश से १० पुलिस कप्तानों को स्थान मिला है, जिनमें अनुराग आर्य भी शामिल हैं। इस सर्वेक्षण में पुलिस अधिकारियों के नेतृत्व, कानून व्यवस्था, अपराध नियंत्रण और जनता के साथ उनके संबंधों को प्रमुख आधार बनाया गया है। इसके अलावा महिलाओं व बच्चों की सुरक्षा, संकट के समय निर्णय क्षमता, आधुनिक तकनीक व नवाचार का इस्तेमाल और पारदर्शी एवं जवाबदेह कार्यशैली जैसे पहलुओं को भी शामिल किया गया है।

**कई स्तर पर मूल्यांकन के बाद चयन**

चयन के लिए आधिकारिक आंकड़ों और प्रशासनिक स्रोतों के साथ ही मीडिया रिपोर्ट, विशेषज्ञों की राय, सोशल मीडिया पर उपलब्ध जानकारी व जमीनी स्तर के सर्वेक्षण को भी आधार बनाया गया। साथ ही अपराध नियंत्रण, कानून व्यवस्था में सुधार, जनमित्र पुलिसिंग, दूरदर्शी नेतृत्व एवं नवाचार, पारदर्शिता और जवाबदेही, त्वरित निर्णय क्षमता, संकट प्रबंधन, व्यवहार कुशलता एवं जनसंपर्क, प्रबुद्ध वर्ग की राय तथा मीडिया और सार्वजनिक छवि समेत दस मानक तय किए गए थे।

यूपी के ये अधिकारी चुने गए यूपी से सूची में आकाश पटेल (चंदौली), अनुराग आर्य (बरेली), अपर्णा रजत कौशिक (मिर्जापुर), दीक्षा शर्मा (ईस्ट जोन लखनऊ), डॉ. कौस्तुभ (गोरखपुर), इलामारन जी. (एटा), केके बिश्नोई (संभल), प्राची सिंह (अंबेडकरनगर), डॉ. इराज राजा (गाजीपुर) और सर्वानंद टी. (अमेठी) का चयन हुआ है।

**बरेली कार्यकाल में अनुराग आर्य की सफलताएं**

अगस्त २०२४ में शाही-शीशगढ़ क्षेत्र में सीरियल किलर कुलदीप को गिरफ्तार कर दहशत का अंत किया, जिससे लगातार हो रही महिलाओं की हत्या पर रोक लगी। सितबंर २०२५ में अभिनेत्री दिशा पाटनी के घर गोल्डी बराड़ गैंग द्वारा की फायरिंग की घटना का खुलासा। दो शूटर एनकाउंटर में ढेर, एक मुठभेड़ में घायल, तीन गिरफ्तार।

* सितंबर २०२५ में तौकीर रजा द्वारा बवाल कराने पर दस केस दर्ज किए गए। तौकीर समेत १०१ उपद्रवी जेल भेजे गए।
* तैनाती के बाद से अब तक लूट, गोकशी, महिला अपराध, हत्या में लिप्त २१३ से ज्यादा बदमाश मुठभेड़ में गिरफ्तार किए।
* अक्टूबर २०२५ में डकैती में वांछित एक लाख रुपये के इनामी फिरोज उर्फ शैतान उर्फ इफ्तेखार और मार्च २०१६ में पत्नी और साले की हत्या करने वाले अफसर का एनकाउंटर।

# रेल्वेच्या तिकिटावर छिद्रे का असतात?

## खरे कारण जाणून वाटेल आश्चर्य!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रेल्वेचे तिकीट खरेदी करताना दोन्ही कडांवर दिसणारी छोटी छिद्रे अनेकांना गूढ वाटतात. ही छिद्रे का असतात, याबाबत अनेक गैरसमज आहेत.

**मोठा गैरसमज :**

बहुतेक लोक समजतात की तिकीट सहज फाडता यावे म्हणून डीई ही छिद्रे ठेवली जातात. मात्र हे पूर्णपणे चुकीचे आहे.

**स्प्रॉकेट होल्स म्हणजे काय? :**

या सूक्ष्म छिद्रांना अधिकृतपणे 'स्प्रॉकेट होल्स' म्हटले जाते. त्यांचा उद्देश छपाई प्रक्रियेशी संबंधित होता.

**जुनी छपाई पद्धत :**

ऑनलाइन बुकिंग आणि आधुनिक प्रिंटर येण्यापूर्वी रेल्वे लाखो तिकिटे छापण्यासाठी कागदाचे सलग रोल वापरत असे.

**डॉट-मॅट्रिक्स प्रिंटरचा वापर :**

त्या काळात डॉट-मॅट्रिक्स प्रिंटर वापरले जात. या प्रिंटरमध्ये लहान दाते असलेली गिअर्स होते.

**गिअर्स आणि छिद्रांचे काम :**

गिअर्स तिकिटाच्या कागदावरील स्प्रॉकेट होल्समध्ये अडकत आणि कागद नियंत्रित वेगाने, अगदी सरळ रेषेत पुढे सरकत असे.

**अचूकतेचे महत्त्व :**

गाडी क्रमांक, तारीख, स्थानके, भाडे आणि सीट यासारखी महत्त्वाची माहिती चुकीच्या ठिकाणी छापली जाऊ नये म्हणून ही छिद्रे कागद योग्य स्थितीत ठेवत असत.

**थर्मल प्रिंटरची क्रांती :**

कालांतराने डॉट-मॅट्रिक्स प्रिंटरची जागा वेगवान व शांत थर्मल प्रिंटरने घेतली. यात रोलर-आधारित प्रणाली असल्याने स्प्रॉकेट होल्सची गरज राहिली नाही.

**कालबाह्य प्रणाली :**

आज थर्मल प्रिंटरमुळे कागदाच्या कडांवर छिद्रे ठेवण्याची आवश्यकताच उरलेली नाही. जुनी यंत्रणा पूर्णपणे बदलली आहे.

**डिजिटल युगातील आठवण :**

आता बहुतेक प्रवासी ई-तिकिट किंवा मोबाईलवर पीएनआर दाखवितात. कागदी तिकिटावरील ही छोटी छिद्रे आता जुन्या तंत्रज्ञानाची सुंदर आठवण बनली आहेत.



# तुमची मुले कधीही करणार नाहीत हट्ट!

## उद्योजक अंकुर वारिकू यांनी सांगितले पालकत्वाचे ३ गोल्डन रूल्स

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या बदलत्या काळात मुलांना चांगल्या संस्कारांसोबत पैशांचे महत्त्व आणि नियोजन शिकवणे आवश्यक झाले आहे. याबाबत अनेक पालक जागरुक झाले आहेत. मात्र, पाल्यांना हे कसे शिकवावे, हा प्रत्येक पालकासमोरील मोठा प्रश्न असतो. तुम्हाला हीच अडचण येत असेल काळजी करू नका. प्रसिद्ध उद्योजक, लेखक आणि कंटेंट क्रिएटर अंकुर वारिकू यांनी आपल्या १५ आणि ९ वर्षांच्या मुलांचे संगोपन करताना स्वतः पाळलेले '३ सोपे गोल्डन रूल्स' सोशल मीडियावर शेअर केले आहेत. हे साधे नियम तुमच्या मुलांना अर्थसाक्षर होण्यास मदत करतील.

**१) मुलांना पैसे नाहीत ऐवजी याची गरज नाही हे सांगा**


वारिकू यांनी सोशल मीडियावर सांगितले आहे, की ते त्यांच्या मुलांशी कधीही खोटं बोलत नाही. एखादी वस्तू मुलांनी मागितली तर आपल्याकडे पैसे नाहीत किंवा आपण गरीब आहोत, असे कधीही सांगितले जात नाही. त्याऐवजी त्या वस्तूची आपल्याला खरच गरज आहे का? यावर आम्ही चर्चा करतो. मुलांना विश्वासात घेऊन समजावले तर ते नक्कीच ऐकतात. मित्राकडे एखादी महागडी वस्तू असेल तर ता आपल्याकडेही असावी हा अट्टाहास मुलांनी धरू नये. कोणतीही वस्तू खरेदी करताना ती केवळ इच्छा म्हणून नव्हे, तर खऱ्या गरजेपोटीच घेतली पाहिजे, हा विचार मुलांच्या मनात रुजवणे आवश्यक आहे.

**२) मुलांना स्वावलंबी बनू द्या**

अंकुर वारिकू यांच्या दुसऱ्या नियमानुसार मुले जेव्हा एखाद्या अडचणीत अडकतात किंवा त्यांना एखादी गोष्ट जमत नसेल तर पालक लगेच मदत करायला पुढे सरसावतात. वारिकू म्हणतात, मुलांना स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवण्याची संधी दिली पाहिजे. उद्या जेव्हा मुले घराबाहेर पडून जगात पाऊल ठेवतील, तेव्हा प्रत्येक निर्णयासाठी त्यांना पालकांवर अवलंबून राहता येणार नाही. त्यामुळे अडचणींशी लढा देण्याचे स्वातंत्र्य त्यांना लहानपणापासूनच मिळायला हवे.

**३) नात्यात मतभेद चालतील, पण अनादर नको!**

तिसरा नियम हा घरातील कौटुंबिक वातावरण आणि नात्यांच्या मूल्यांशी संबंधित आहे. पालकांमध्ये अनेक मुद्द्यांवरुन मतभेद होऊ शकतात. अनेकदा मुले समोर असतानाही हे घडू शकतात. वारिकू यांच्या मते अशावेळी ऐकमेकांचा अनादर होणार नाही, याची काळजी घ्यावी. तुमची मुले तुमचे अनुकरण करणार आहेत, हे लक्षात ठेवा. त्यामुळे वादविवाद होणे स्वाभाविक आहे, पण एकमेकांचा आदर राखणे अनिवार्य आहे, हा धडा मुलांना घरातूनच मिळतो.



**मुलांना पॉकेटमनी देणे म्हणजे आर्थिक नियोजन शिकवणे नव्हे**

पाल्यांना केवळ पॉकेटमनी देणे किंवा त्यांची प्रत्येक इच्छा पूर्ण करणे म्हणजे उत्तम पालकत्व नव्हे. त्यांना पैशांचे आर्थिक मूल्य, समस्या सोडवण्याचे कौशल्य आणि नात्यांचा सन्मान करायला शिकवणे हीच पालकांनी दिलेली सर्वांत मोठी 'आर्थिक' शिकवण आहे.

# पांढरा की पिवळा? नेमका कोणता बटाटा खावा?



## बाजारात बटाटा घेताना रंग पाहून 'ही' चूक करू नका...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बटाटा म्हणजे स्वयंपाकघरातील सर्वांत बहुगुणी पदार्थ. कधी बटाट्याची भाजी, बटाट्याचे काप, काचऱ्या, कधी पराठे, कधी चाट तर कधी कुरकुरीत फ्रेंच फ्राइज... कधी भाजी नेमकी काय करायची हे सुचत नसेल की लगेच बटाट्याची साधी सोपी भाजीसुद्धा जेवण पूर्ण करते. बटाट्याशिवाय अनेक पदार्थांची चवच अपुरी वाटते. त्यामुळे बाजारातून बटाटे घेताना आपण सहसा त्यांचा आकार, ताजेपणा आणि किंमत पाहतो. पण बटाट्याचा रंग आणि त्याचा पोतही तुमच्या पदार्थाच्या चवीवर आणि टेक्श्चरवर परिणाम करू शकतो, हे तुम्हाला माहीत आहे का? बाजारात प्रामुख्याने पांढऱ्या किंवा फिकट रंगाचे आणि पिवळसर रंगाचे बटाटे दिसतात. मात्र फक्त रंगावरून बटाटा चांगला किंवा वाईट ठरवता येत नाही. बटाट्याची जात, त्यातील स्टार्च, ओलावा आणि पोत यावर तो शिजवल्यानंतर कसा होईल हे अधिक अवलंबून असते.

**पांढरा आणि पिवळा बटाटा यात नेमका फरक काय?**

सर्वप्रथम एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्या, बटाट्याचा रंग हा त्यातील स्टार्चचे अचूक मोजमाप नाही. पांढरा बटाटा म्हणजे नेहमीच जास्त स्टार्च असतो आणि पिवळा बटाटा म्हणजे कमी स्टार्च असतो, असे सरसकट म्हणता येत नाही. बटाट्याच्या वेगवेगळ्या जातींमध्ये स्टार्च आणि ओलाव्याचे प्रमाण वेगळे असते. त्यानुसार काही बटाटे शिजवल्यानंतर हलके, कोरडे आणि सहज मॅश होणारे असतात, तर काही बटाटे क्रीमी आणि घट्ट पोताचे राहतात. यामुळे पदार्थ बनवताना रंगापेक्षा बटाट्याचा पोत आणि त्याची जात लक्षात घेणे अधिक महत्त्वाचे ठरते.

**फ्रेंच फ्राइजसाठी कोणता बटाटा?**

तुम्हाला बाहेरून कुरकुरीत आणि आतून मऊ फ्रेंच फ्राइज हवे असतील, तर तुलनेने जास्त स्टार्च आणि कमी ओलावा असलेला बटाटा उपयोगी ठरतो. अशा बटाट्यांमध्ये तळल्यानंतर बाहेरील भाग चांगला क्रिस्पी होण्यास मदत होते, तर आतला भाग मऊ राहतो. त्यामुळे फ्रेंच फ्राइज बनवताना फक्त पांढरा रंग पाहण्यापेक्षा high-starch किंवा floury प्रकारचा बटाटा निवडणे अधिक योग्य ठरते. मॅरड पोटॅटो अगदी हलका आणि फ्लफी हवा असेल तर सहज मॅश होणारा, तुलनेने जास्त स्टार्च असलेला बटाटा चांगला पर्याय ठरतो. असा बटाटा शिजवल्यानंतर सहज फुटतो आणि मॅश केल्यावर मऊ टेक्श्चर मिळण्यास मदत होते. पण मॅरड पोटॅटो खूप वेळ उकळल्यास बटाट्यात जास्त पाणी जाऊ शकते आणि त्याचा पोत चिकट किंवा गमसारखा होऊ शकतो.

**भाजी, सलाड किंवा स्टूसाठी पिवळसर बटाटा का उपयोगी?**

आता समजा तुम्हाला बटाट्याचे तुकडे भाजी, सलाड, स्टू किंवा सूपमध्ये अख्खे आणि व्यवस्थित ठेवायचे आहेत. अशावेळी कमी स्टार्च आणि तुलनेने घट्ट, waxy किंवा firm texture असलेला बटाटा अधिक उपयोगी ठरतो. अशा बटाट्याचे तुकडे शिजवल्यानंतरही सहज भुरभुरत नाहीत आणि त्यांचा आकार टिकून राहण्यास मदत होते. म्हणूनच बटाट्याच्या सलाडसारख्या पदार्थांसाठी firm, waxy प्रकारचा बटाटा चांगला पर्याय मानला जातो.

**बटाटा उकडताना 'ही' चूक करू नका**

बटाटा कोणता आहे हे महत्त्वाचे असले तरी तो कसा शिजवता हेही तितकेच महत्त्वाचे आहे. बटाटे उकडताना त्यांना गरजेपेक्षा जास्त वेळ शिजवल्यास ते अतिशय मऊ होऊ शकतात आणि तुकडे तुटण्याची शक्यता वाढते. संपूर्ण बटाटे किंवा मोठे तुकडे उकडताना साधारणपणे थंड पाण्यापासून सुरुवात करणे आणि बटाटा फक्त आवश्यक तेवढाच शिजवणे उपयोगी ठरते. काटा किंवा सुरी सहज आत जाते, पण बटाटा पूर्णपणे फुटत नाही, अशा अवस्थेत तो योग्य शिजल्याचे समजू शकता.

**मग पांढरा की पिवळा, कोणता बटाटा चांगला?**

याचे एकच उत्तर नाही! तुम्ही कोणता पदार्थ बनवत आहात, त्यावर योग्य बटाट्याची निवड अवलंबून आहे.

**फ्रेंच फ्राइज :** जास्त स्टार्च, कमी ओलावा असलेला floury बटाटा
**मॅण्ड पोटॅटो :** सहज मॅश होणारा, स्टार्चयुक्त बटाटा
बटाट्याचे सलाड : घट्ट पोताचा waxy बटाटा
**स्टू/सूप** : शिजवल्यानंतर आकार टिकवणारा firm बटाटा
**साधी भाजी** : पदार्थाच्या प्रकारानुसार floury किंवा firm दोन्ही प्रकार वापरता येतात

"पांढरा बटाटा म्हणजे चांगला आणि पिवळा म्हणजे कमी चांगला" किंवा याउलट असे समीकरण नाही. बटाट्याचा रंग हा फक्त एक बाह्य गुणधर्म आहे. त्याची जात, स्टार्च, ओलावा आणि टेक्श्चर यांचा पदार्थाच्या अंतिम परिणामावर अधिक प्रभाव असतो. त्यामुळे पुढच्या वेळी बाजारात बटाटे घेताना फक्त रंग पाहू नका; कोणता पदार्थ बनवणार आहात, त्यानुसार योग्य प्रकार निवडा. योग्य बटाटा निवडला तर साध्या बटाट्याच्या पदार्थाचाही पोत आणि चव दोन्ही अधिक चांगली होऊ शकतात.




# मेष, वृषभसह 'या' ५ राशींना ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात लागणार लॉटरी

**बाबा वेंगाची भविष्यवाणी; श्रीमंतीचे योग, वाचा लकी राशी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिष शास्त्रानुसार बाबा वेंगाने दिलेल्या भविष्याबाबत देशभरात उत्सुकता निर्माण होते. याचे कारण म्हणजे बाबा वेंगा यांना भविष्यात घडणाऱ्या घटनांचा आधीच अंदाज लावता येतो. त्यानुसार आता ऑगस्ट महिन्याचा शेवटचा आठवडा लवकरच सुरू होणार आहे. ज्योतिष शास्त्रानुसार २३ ते ३० ऑगस्ट २०२६ असा ऑगस्ट महिन्याचा शेवटचा आठवडा असणार आहे. या आठवड्यात अनेक शुभ योग निर्माण होणार आहे. मात्र, बाबा वेंगा यांच्या भविष्यवाणीनुसार कोणत्या ५ राशींसाठी ऑगस्टचा शेवटचा आठवडा भाग्यशाली ठरणार आहे ते जाणून घेऊया.

**मेष :** २३ ते ३० ऑगस्ट २०२६ रोजीचा काळ मेष राशीच्या व्यक्तींसाठी नव्या संधी घेऊन येऊ शकतो. या काळात तुमची रखडलेली कामे मार्गी लागण्याची शक्यता आहे. करिअरमध्ये महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना चांगली बातमी मिळण्याचे संकेत आहेत. आर्थिक बाबतीतही परिस्थिती सुधारू शकते. तुम्हाला तुमच्या मेहनतीचे योग्य फळ मिळू शकते.

**वृषभ :** या राशीसाठी हा आठवडा आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे. उत्पन्न वाढविण्याची एखादी नवीन संधी समोर येऊ शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या निर्णयक्षमतेचे कौतुक होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील एखादा महत्त्वाचा निर्णय तुमच्या बाजूने होऊ शकतो. नवीन जबाबदारी मिळाली तरी ती भविष्यात मोठा फायदा देऊ शकते.

**कर्क :** या राशीच्या व्यक्तींसाठी २३ ते ३० ऑगस्ट २०२६ दरम्यान प्रगतीचे संकेत आहेत. अनेक दिवसांपासून सुरू असलेली चिंता कमी होऊ शकते. नोकरी किंवा व्यवसायात नवीन संपर्क फायदेशीर ठरू शकतात. आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी योग्य मार्ग सापडण्याची शक्यता आहे. कुटुंबातील व्यक्तींकडूनही महत्त्वाची साथ मिळू शकते.

**सिंह :** या राशीसाठी हा आठवडा आत्मविश्वास वाढवणारा ठरू शकतो. कामाच्या ठिकाणी तुमच्या नेतृत्वगुणांची दखल घेतली जाऊ शकते. पदोन्नती, नवीन प्रोजेक्ट किंवा जबाबदारी मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. व्यवसाय करणाऱ्यांना नवीन ग्राहक किंवा फायदेशीर करार मिळू शकतो. आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरण्याची शक्यता आहे.

**धनू :** या राशीसाठी २३ ते ३० ऑगस्टचा काळ नव्या दिशेने वाटचाल करण्याचा ठरू शकतो. शिक्षण, नोकरी, व्यवसाय किंवा प्रवासाशी संबंधित एखादी चांगली संधी मिळू शकते. आर्थिक निर्णय घेताना मात्र घाई न करण्याचा सल्ला दिला जातो. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट भविष्यासाठी फायदेशीर ठरू शकते. योग्य नियोजन केल्यास या आठवड्यातील संधी मोठा फायदा देऊ शकतात.

# आज श्रावण पुत्रदा एकादशी
# पूजाविधी, व्रत, पारण वेळ, कथा आणि महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यंदाच्या श्रावणातील पुत्रदा एकादशी रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी आहे. या दिवशी पूजा विधी, व्रत नियम, पारण वेळ, मंत्र, कथा, महत्त्व समजावून घेत नेमके काय व कसे आध्यात्मिक कार्य करावे, यासंदर्भातील माहिती जाणून घेणे आवश्यक आहे.

श्रावण पुत्रदा एकादशी २०२६ हे हिंदू धर्मात भगवान विष्णूंना समर्पित एक अत्यंत महत्त्वाचे एकादशीचे व्रत आहे. हे व्रत श्रावणात शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला पाळले जाते. धार्मिक मान्यतेनुसार पुत्रदा एकादशीचे व्रत संतती सुख, मुलांची समृद्धी आणि कुटुंबाच्या कल्याणाच्या इच्छेने केले जाते. यंदा श्रावण पुत्रदा एकादशी रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वत्र साजरी केली जाईल. पंचांगानुसार एकादशी तिथी २३ ऑगस्टला रात्री २:०० वाजता सुरू होऊन २४ ऑगस्टला सकाळी ४:१८ वाजेपर्यंत असेल. धार्मिक परंपरेनुसार ही एकादशी २४ ऑगस्ट रोजी देखील साजरी केली जाऊ शकते.

### पुत्रदा एकादशी म्हणजे काय?

पुत्रदा एकादशी ही भगवान श्रीहरी विष्णूंना समर्पित एकादशी आहे. वर्षात दोन प्रमुख पुत्रदा एकादशी येतात. एक पौष महिन्यात आणि दुसरी श्रावण महिन्यात. श्रावण पुत्रदा एकादशी श्रावण शुक्ल पक्षात येते. धार्मिक मान्यतेनुसार हे व्रत संततीप्राप्तीची इच्छा असणारे दाम्पत्य तसेच आपल्या मुलांच्या सुख, आरोग्य आणि उज्ज्वल भविष्याची कामना करणारे भक्त अतिशय श्रद्धा भावनेने पाळतात.

### श्रावण पुत्रदा एकादशीचे धार्मिक महत्त्व



एकादशी तिथी ही भगवान विष्णूंच्या उपासनेसाठी विशेष मानली जाते. श्रावण महिन्यात येणाऱ्या पुत्रदा एकादशीचे विशेष धार्मिक महत्त्व आहे. या दिवशी भक्त भगवान विष्णूंकडे खालील गोष्टींसाठी प्रार्थना केली जाते. यामध्ये संतती सुख, मुलांचे दीर्घायुष्य, मुलांचे आरोग्य आणि सुख, कुटुंबाची समृद्धी, मानसिक शांती, पापकर्मांपासून मुक्ती, आध्यात्मिक उन्नती.

### श्रावण पुत्रदा एकादशी पूजा विधी

पुत्रदा एकादशीच्या दिवशी घरी सोप्या पद्धतीने भगवान विष्णूंची पूजा केली जाऊ शकते. सकाळी लवकर उठून स्नान करावे. स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. घरातील पूजेची जागा स्वच्छ करावी. भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांची प्रतिमा किंवा मूर्ती स्थापन करावी. दिवा आणि धूप लावावा. भगवान विष्णूंना पिवळी फुले आणि फळे अर्पण करावीत. पिवळे वस्त्र किंवा पिवळी मिठाई अर्पण करू शकता. भगवान विष्णूंना तुळशीची पाने अर्पण करावीत. विष्णूसहस्रनाम, विष्णू मंत्र किंवा एकादशी व्रत कथेचे पठण करावे. भगवान विष्णूंची आरती करावी. संतती आणि कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करावी. दुसऱ्या दिवशी द्वादशी तिथीला पारण करावे.

### पुत्रदा एकादशी व्रत कसे ठेवावे?

पुत्रदा एकादशीला भक्त त्यांच्या क्षमतेनुसार आणि कौटुंबिक परंपरेनुसार व्रत करतात. यामध्ये निर्जला व्रत, फलाहार व्रत, सात्त्विक अन्नासह व्रत केले जाते. एकादशी व्रतात सामान्यतः भात आणि धान्याचे सेवन केले जात नाही. मात्र, व्रताचे नियम वेगवेगळ्या संप्रदायांमध्ये आणि कुटुंबांमध्ये भिन्न असू शकतात. आरोग्याची समस्या असलेल्या लोकांनी कडक किंवा निर्जला व्रत ठेवण्यापूर्वी योग्य सल्ला घ्यावा.

### श्रावण पुत्रदा एकादशीला काय खावे?

व्रत करणारे भक्त त्यांच्या परंपरेनुसार फलाहार करू शकतात. सामान्यतः व्रतामध्ये खालील पदार्थांचे सेवन केले जाते. यात फळे, दूध व दही, मखाना, साबूदाणे, शिंगाड्याचे पीठ व भगरीचे/राजगिऱ्याचे पीठ, बटाटे व भुईमुगाचे दाणे, सैंधव मीठ.

### पुत्रदा एकादशीला कोणता मंत्र म्हणावा?

भगवान विष्णूंच्या पूजेदरम्यान खालील मंत्राचा जप केला जातो.

ॐ नमो भगवते वासुदेवाय।

याशिवाय भक्त 'ॐ नमो नारायणाय' या मंत्राचाही जप करू शकतात. भगवान विष्णूंच्या पूजेत तुळशीचे पान अर्पण करणे विशेष शुभ मानले जाते.

### श्रावण पुत्रदा एकादशीला काय करावे?

भगवान विष्णूंची पूजा करावी. एकादशीचे व्रत करावे. विष्णूसहस्रनामाचे पठण करावे. भगवान विष्णूंच्या मंत्रांचा जप करावा. एकादशी व्रत कथा ऐकावी किंवा वाचावी. तुळशीची पूजा करावी. गरजू लोकांना अन्न किंवा वस्त्र दान करावे. भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांच्याकडे कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना करावी. रात्री भजन आणि कीर्तन करू शकता.

### पुत्रदा एकादशीला काय करू नये?

भात आणि धान्याचे सेवन करू नये. राग आणि वादावादी टाळावी. कोणालाही अपशब्द बोलू नयेत. नकारात्मक विचारांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा. खोटे बोलणे आणि फसवणूक करण्यापासून दूर राहावे. व्रताच्या नावाखाली शरीराला अतिशय त्रास देऊ नये. व्रताचा मुख्य उद्देश भक्ती, आत्मसंयम आणि भगवान विष्णूंचे स्मरण करणे हा आहे.

### श्रावण पुत्रदा एकादशी व्रत कथा

पुत्रदा एकादशीशी संबंधित धार्मिक कथांमध्ये एका राजाची आणि त्याच्या निपुत्रिक असण्याची कथा येते. कथेनुसार राजाला मूल नसल्यामुळे तो खूप चिंतित होता. राजाने आपल्या समस्येच्या निवारणासाठी ऋषी आणि संतांकडून मार्गदर्शन मागितले. त्यांनी राजाला पुत्रदा एकादशीचा व्रत करण्याचा आणि भगवान विष्णूंची श्रद्धेने पूजा करण्याचा सल्ला दिला. राजाने विधीवत एकादशीचा व्रत ठेवला आणि भगवान विष्णूंची आराधना केली. धार्मिक मान्यतेनुसार भगवान विष्णूंच्या कृपेने त्याची मनोकामना पूर्ण झाली. ही कथा भक्तांना श्रद्धा, संयम आणि देवाप्रती समर्पणाचा संदेश देते.

### श्रावण पुत्रदा एकादशीचे पारण कधी करावे?

एकादशी व्रताचे पारण द्वादशी तिथीला केले जाते. श्रावण पुत्रदा एकादशीचे व्रत २३ ऑगस्टला केले जाईल आणि पारण २४ ऑगस्टला केले जाईल. पंचांग गणनेनुसार २४ ऑगस्ट रोजी दुपारी १:०३ ते ३:३६ वाजेपर्यंत पारणाची वेळ दिली आहे. तथापि ही वेळ स्थानानुसार बदलू शकते. वैष्णव परंपरेत २४ ऑगस्टला एकादशी व्रत करणाऱ्यांसाठी पारण २५ ऑगस्टच्या सकाळी दिले आहे.

### श्रावण पुत्रदा एकादशी २०२६ का खास आहे?

श्रावण महिना भगवान शिवजींच्या उपासनेसाठी प्रसिद्ध असण्यासोबतच अनेक धार्मिक व्रतांचा आणि सणांचा महिनाही आहे. याच महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला श्रावण पुत्रदा एकादशी साजरी केली जाते.

# घरात नेहमी भांडणे होतात, जाणवते पैशांची अडचण?

**मग चाणक्यांनी सांगितलेल्या 'या' ५ चुका आजच सुधारा, दिसेल फरक**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या कुटुंबात नेहमी आनंदी वातावरण रहावे, सुख-शांती नांदावी, अशी प्रत्येकाची इच्छा असते. यासाठीच लोक रात्रंदिवस मेहनत करत असतात. विविध उपाय आणि पूजा-पाठही करतात. तरीही अनेकदा घरातील वातावरण राहते. खरेतर यामागे कोणतंही मोठे संकट नसून, आपल्या रोजच्या आयुष्यातील छोट्या-छोट्या वाईट सवयीच या गृहकलहाचे मुख्य कारण असतात. यावर आचार्य चाणक्य यांनी काही अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. ज्या वेळीच बदलल्या तर घरातील वातावरण पुन्हा एकदा आनंदी आणि प्रसन्न होऊ शकते.

### १) कडू बोलणे आणि टोमणे मारणे टाळा

आचार्य चाणक्य यांच्या मते, ज्या घरात लोक एकमेकांशी गोड बोलत नाहीत, तिथे शांतता कधीही टिकत नाही. छोट्या-छोट्या गोष्टींवरून टोमणे मारणे किवा मोठ्या आवाजात बोलणे नाती पोकळ करते. अनेकदा एक किरकोळ गोष्ट केवळ चुकीच्या भाषेमुळे मोठ्या वादाचे रूप घेते. म्हणूनच, जेव्हाही बोलाल तेव्हा खूप विचारपूर्वक आणि प्रेमाने बोला. आपल्या संभाषणात गोडवा ठेवणे हाच कुटुंबाला एकत्र बांधून ठेवण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे.

### २) अनियंत्रित रागामुळे बिघडतात कामे

राग हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू मानला जातो. चाणक्य नीतीनुसार, रागीट व्यक्तीची विचार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता नष्ट होते. जो माणूस प्रत्येक क्षुल्लक गोष्टीवर नियंत्रण गमावतो, त्याला योग्य आणि अयोग्य यातील फरक कळत नाही. घरात वारंवार होणारे वाद मुलांच्या आणि वृद्धांच्या मनावर खूप वाईट परिणाम करतात. कोणताही मतभेद मिटवण्याचा सर्वात योग्य मार्ग म्हणजे शांतपणे एकत्र बसून चर्चा करणे.

### ३) अविश्वास आणि संशयापासून दूर राहा

कोणत्याही नात्याचा पाया हा विश्वासावर टिकून असतो. जेव्हा कुटुंबातील सदस्यांमधील हा विश्वास संपू लागतो, तेव्हा आपोआप दुरावा वाढू लागतो. एकमेकांवर विनाकारण संशय घेणे किंवा गोष्टी लपवणे घरातील आपुलकी संपवून टाकते. मनात काही गोंधळ किंवा गैरसमज असेल, तर तो समोरासमोर बसून मोकळेपणाने व्यक्त केला पाहिजे. प्रामाणिकपणाच नात्यात गोडवा आणि स्थैर्य टिकवून ठेवतो.

### ४) अन्न आणि धनाचा अनादर करू नका

चाणक्य यांच्या मते ज्या घरात अन्न वाया घालवले जाते किवा पैशांची उधळपट्टी केली जाते, तिथे दारिद्य पाय पसरू लागते. विनाकारण केलेला उधळपट्टीचा खर्च पुढे जाऊन मोठ्या मानसिक तणावाचे आणि भांडणांचे कारण बनतो. घरात जितकी गरज असेल तितकाच खर्च करा आणि ताटात तितकेच अन्न घ्या जितके तुम्ही खाऊ शकता. अन्न आणि धनाचा आदर करणाऱ्या कुटुंबांमध्ये कधीही आर्थिक टंचाई आणि कलह निर्माण होत नाही.

### ५) आळस आणि घाण साचू देऊ नका

घराची स्वच्छता आणि शिस्त यांचा आपल्या मनावर थेट परिणाम होतो. आचार्य चाणक्य म्हणतात की, आळस माणसाची प्रगती पूर्णपणे थांबवतो. जे लोक आजचे काम उद्यावर ढकलतात आणि घरात अस्वच्छता ठेवतात, त्यांच्या घरात नकारात्मक ऊर्जा वाढते. याउलट, स्वच्छ घर आणि योग्य दिनचर्या घरातील लोकांमध्ये सकारात्मक विचार निर्माण करते, ज्यामुळे परस्परांमधील ताळमेळ आणि प्रेम वाढते.

# श्रावणी रविवारी कसे केले जाते आदित्य राणूबाईंचे व्रत?

## जाणून घ्या त्याचे महत्त्व, कसा केला जातो पूजा विधी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण हा सनातन धर्मीयांसाठी अतिशय महत्त्वाचा आणि पवित्र महिना समजला जातो. हा संपूर्ण महिना भगवान शिवजींना समर्पित असल्याने या काळात शंकरजींची पूजा करणे पुण्यफलदायी मानले जाते. श्रावण महिन्यातील प्रत्येक दिवसाला खास महत्त्व आहे. याच श्रावणातील रविवार देखील अतिशय शुभ समजला जातो. श्रावण महिन्यातील रविवारी सूर्यदेवांची पूजा केली जाते. या दिवशी आदित्य राणूबाई व्रत केले जाते. हे व्रत सूर्यदेवांना समर्पित आहे. रविवार हा सूर्याचा वार म्हणून ओळखला जातो. या दिवशी सूर्याची आराधना करण्याची पद्धत आहे. श्रावणात देखील रविवारी सूर्याची पूजा केली जाते. मात्र, त्या आधी पूजा केली जाते ती सूर्याची पत्नी असणाऱ्या आदित्य राणूबाई यांची. श्रावणी रविवारी याच पूजेचे जास्त महत्त्व असते. चला जाणून घेऊया या पूजेबद्दल अधिक माहिती.

श्रावणाच्या केवळ पहिल्या रविवारी हे व्रत करण्याची प्रथा आहे. हे स्त्रियांनी करावयाचे व्रत आहे. रविवारच्या दिवशी सकाळी उठून अंघोळ करून, देवघराजवळ विड्याच्या पानावर सूर्याचे चित्र रक्तचंदनाने काढावे. बाजूला एका वर्तुळात षटकोण काढावा. नंतर सहापदरी दोऱ्याला सहा गाठी मारून मग (सूर्यचित्र, षट्कोन आणि सहा गाठी मारलेला सहापदरी दोरा) या सर्वांची एकत्रित पूजा करावी. ही पूजा झाल्यानंतर दुपारी एका सुवासिनीला जेवायला बोलवावे. असे सांगितले जाते, की राणूबाई ही सूर्याची पत्नी आहे आणि सूर्याच्या पत्नीची पूजा या व्रतात केली जाते. आजही खानदेशात हे व्रत विशेष प्रचलित आहे.

खानदेशातील बऱ्याच घरांमध्ये कुठल्याही मंगलकार्याच्या आधी राणूबाई आणि सूर्याचे लग्न लावण्याची पद्धत आहे. फार पूर्वीपासून कुठल्या ना कुठल्या रूपात सूर्यपूजा करण्याची प्रथा आपल्या संस्कृतीत प्रचलित आहे. श्रावण मास हा उपवासांचा, व्रत-वैकल्यांचा महिना म्हणून ओळखला जातो. साहजिकच पहिला श्रावणी रविवार हा आदित्य-राणूबाईंच्या पूजेसाठी राखला गेला असावा. ज्यांना शक्य असेल त्यांनी विधिवत हे व्रत करावे. शक्य नसेल त्यांनी स्नानादी नित्यकर्म करून सूर्य आणि राणूबाईंची मानसपूजा करून गायत्री मंत्राचा जप करावा. आदित्य राणूबाई व्रत करणे शक्य नसल्यास श्रावणातील प्रत्येक रविवारी आदित्याची पूजा करून त्याला खिरीचा नैवेद्य दाखवावा. केवळ श्रावणातील रविवारी नाही, तर वर्षभरातील सर्व रविवारी सूर्यपूजा करावी. मात्र, शास्त्रोक्त पूजन शक्य नसल्यास केवळ भक्तिपूर्वक नमस्कार करावा. दुपारी बारा वाजण्याच्या आधी गायत्री मंत्राचा यथाशक्ती जप करावा, असे सांगितले जाते.

### पूजा साहित्य

सूर्यदेवांचे चित्र किंवा मूर्ती (किंवा तांब्याचे ताट/सूर्यप्रतीक).तांब्याचा ताम्हन/लोटा (पाण्यासाठी).तांबे किंवा पितळेचे ताट, गंगाजल, दूध, हळद, कुंकू, अक्षता (तांदूळ), लाल फुले (जास्वंद किंवा कमळ), गव्हाचे दाणे, गूळ, तूप, धूप, दीप, कापूर, नैवेद्य (गव्हाचे पीठ आणि गुळाचे लाडू, खीर, केळी), आणि पान-सुपारी. राणूबाईसाठी लाल कापड, लाल बांगड्या, आणि हळदी-कुंकवाचा करंडा (काही ठिकाणी राणूबाईला स्थानिक देवी म्हणून पूजले जाते).पूजा पद्धत-पूजेच्या ठिकाणी स्वच्छता करावी. घरातील पूजास्थान किंवा पूर्व दिशेला पूजा करावी, कारण सूर्यदेव पूर्व दिशेशी संबंधित आहेत. पूजेच्या ठिकाणी स्वच्छ कापड पसरवावे आणि त्यावर तांब्याचे ताट किंवा सूर्यदेवाचे चित्र ठेवावे.तांब्याच्या लोट्यात पाणी, हळद, कुंकू आणि लाल फुले घालून सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करावे. हे अर्घ्य सूर्योदयाच्या वेळी पूर्व दिशेला तोंड करून द्यावे.सूर्यदेवाला गव्हाचे दाणे, गूळ, आणि लाल फुले अर्पण करावी.धूप, दीप आणि कापूर लावून सूर्यदेवाची आरती करावी. खालील सूर्य मंत्रांचे उच्चारण करावे (प्रत्येकी ११ किंवा १०८ वेळा): ॐ सूर्याय नमः। ॐ घृणि सूर्याय नमः। ॐ आदित्याय नमः। सूर्य गायत्री मंत्र : ॐ भास्कराय विद्महे महाद्युतिकराय धीमहि, तन्नो आदित्यः प्रचोदयात्।





### सूर्याची आरती

***जयदेव जयदेव जयजय श्रीसूर्या ।***
***एकारति ओवाळु सुरगण – प्रभुवर्या ॥धृ॥***
***द्वादश नामें करुनि करितां तव प्रणती ।***
***दोष निवारुनि इच्छित मनोरथ पुरती ।***
***अर्ध्यप्रदान करितां पुण्याची प्राप्ती ।***
***दर्शनमात्रें साधक भवसागर तरती ॥१॥***
***ब्राह्मणकुळासि दैवत तुजवांचुनि नाहीं ।***
***त्रिकाळ अर्घ्य देती द्विजवर लवलाहीं ॥***
***प्रथम अहूति अर्पण यज्ञाचे ठायीं ।***
***सर्व जगाचि दृष्टी तुजयोगें पाहीं ॥२॥***
***दशयोजन मोठा रथ निजसारथि अरुण ॥***
***सप्तमुखाचा अश्व शोभतसे वहन ।***
***अठ्यायशीसहस्त्र ऋषि करिति स्तवन ।***
***निरंजन प्रार्थितसे करुनिया नमन ॥३॥***

आदित्य राणूबाईला स्थानिक देवी म्हणून पूजले जाते. तिच्यासाठी लाल कापडावर हळद-कुंकवाचा करंडा, लाल बांगड्या, आणि फुले ठेवावी.राणूबाईला गव्हाच्या पिठाचे लाडू, खीर किंवा गोड नैवेद्य अर्पण करावा.खालील मंत्राने राणूबाईला प्रार्थना करावी: **ॐ राणूबायै नमः** काही ठिकाणी राणूबाईला सूर्यदेवाची पत्नी संज्ञा किंवा छाया म्हणून पूजले जाते, त्यामुळे **ॐ संज्ञायै नमः।** किंवा **ॐ छायायै नमः।** मंत्रांचा जप करावा.राणूबाईला हळद, कुंकू, आणि अक्षता अर्पण करून धूप-दीप दाखवावे.
सूर्यदेव आणि राणूबाईला गव्हाच्या पिठाचे लाडू, गुळाची खीर, किंवा केळी यांचा नैवेद्य दाखवावा.नैवेद्य दाखवल्यानंतर कुटुंबातील सर्वांना प्रसाद वाटावा. सूर्यदेव आणि राणूबाईच्या चित्राला किंवा प्रतीकाला तीन किंवा सात प्रदक्षिणा घालाव्या.कुटुंबाच्या सुख, समृद्धी, आणि आरोग्यासाठी प्रार्थना करावी. उदाहरणार्थः "हे सूर्यदेवा आणि राणूबाई, आमच्या कुटुंबाला सुख, शांती आणि समृद्धी प्रदान करा. सर्व संकटांचा नाश करा."

काही ठिकाणी रविवारी उपवास ठेवला जातो.उपवासात गव्हाचे पदार्थ, गूळ, आणि फळांचे सेवन केले जाते. मीठ, तिखट आणि तेलकट पदार्थ टाळावेत.व्रताच्या दिवशी ब्रह्मचर्य पाळावे आणि मन शुद्ध ठेवावे.या दिवशी केस विंचरु नये.पूजा आणि कहाणी केल्याशिवाय कोणत्या पदार्थाचे सेवन करु नये.पूजेनंतर गव्हाचे दाणे, गूळ, किंवा तांब्याचे भांडे दान करावे. गरीबांना अन्नदान करणे शुभ मानले जाते.श्रावणातील प्रत्येक रविवारी हे व्रत पाळावे.
आदित्य राणूबाई व्रताची कथा नक्की करावी.सूर्यदेवाच्या कृपेने आरोग्य, शक्ती आणि तेज प्राप्त होते.राणूबाईच्या आशीर्वादाने कुटुंबात सुख-शांती आणि समृद्धी येते.संकटे, रोग आणि शत्रूंचा नाश होतो.पती-पत्नीचे नाते दृढ होते आणि मुलांचे कल्याण होते.जर सूर्यदेवाला अर्घ्य देणे शक्य नसेल, तर घरी तांब्याच्या ताटावर सूर्याचे चित्र काढून किंवा सूर्यप्रतीक ठेवून पूजा करावी.पूजेनंतर गव्हाचे दाणे आणि गूळ गाईला खाऊ घालणे शुभ मानले जाते.व्रत पाळताना सात्विक आहार घ्यावा आणि क्रोध, द्वेष यापासून दूर राहावे.या व्रतामुळे भक्तांना सूर्यदेव आणि राणूबाईच्या कृपेने सर्व मनोकामना पूर्ण होतात आणि जीवनात सुख-शांती प्राप्त होते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**